CMYK

सुविचार
नम्रता हीच खरी सज्जनतेची ओळख आहे.

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 115 ■ बुधवार दि.4 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5



देश-विदेशातील २४ कंपन्यांची एमआयडीसीमध्ये गुंतवणूक

पेज ४

## तुळजाभवानीच्या भक्तांना मिळणार शुध्द तुपातील लाडू

### पुण्यातील चितळे बंधू सोबत मंदिर संस्थानचा लाडू प्रसादाचा करार







आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजाभवानीच्या भक्तांना आता शिर्डी, तिरुपती बालाजी प्रमाणेच शुद्ध तुपातील लाडू देण्यात येणार असून, यासाठी पुण्यातील चितळे बंधू बरोबर मंदिर संस्थानचा करार झाला आहे. याबाबत भाविकांकडून लाडू प्रसादासाठी किती किंमत घ्यायची याबाबतचा निर्णय अजून बाकी आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, तुळजाभवानी मंदिर संस्थानने काही दिवसांपूर्वीच भाविकांना प्रसाद म्हणून शुध्द तुपातील लाडू देण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. यामध्ये पुण्यातील चितळे बंधूंना या लाडूंचा पुरवठा करण्याचे कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले आहे. मंदिर संस्थानच्या अंदाजानुसार दररोज चाळीस हजार भाविक तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येत असतात. त्यामधील निम्म्या भाविकांच्या अनुशंगाने म्हणजेच अंदाजे वीस हजार लाडू सुरुवातीस म ागवण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच भाविकांचा प्रतिसाद बघून पुढे लाडूंची संख्या वाढवण्याचा विचार मंदिर संस्थान करणार आहे. प्रसादाचा लाडू शुद्ध तुपातील असणार आहे. त्यामध्ये काजू, बदाम, केशर याचा देखील समावेश असणार आहे. एका लाडूचे वजन ५० ग्रॅम असणार आहे. एका भाविकास एक किंवा दोन लाडू देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे लवकरच आता तुळजापुरात येणाऱ्या भाविकांना शुद्ध तुपातील लाडूचा प्रसाद मिळणार आहे.

## भूखंडांच्या भाडेपट्ट्यातून एमएमआरडीएला मिळाले ४ हजार कोटी रूपये

आरंभ मराठी | मुंबई

महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने बांद्रा-कुर्ला संकुल (बीकेसी) येथील तीन अत्यंत महत्त्वाच्या व्यावसायिक भूखंडांचे वाटपपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांना आज प्रदान केले. या भूखंडांच्या भाडेपट्ट्यातून एमएमआरडीएला ३ हजार ८४० कोटी ४९ लाख रुपये मिळाले आहेत. यामुळे १५ हजार हाय-टेक नोकऱ्यांची निर्मिती शक्य होणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख हस्ते सुमिटोमो रिॲलिटी अँड डेव्हलपमेंट लि. या जपानी कंपनीला दोन भूखंडाचे आणि ब्रूकफिल्ड स्ट्रॅटेजिक रिअल इस्टेट या कंपनीला एक भूखंडाचे वाटपपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, एमएमआरडीएचे आयुक्त डॉ.संजय मुखर्जी तसेच जपानचे शिष्टमंडळ आदी उपस्थित होते.मुंबई बीकेसी येथील सी-१३ आणि सी-१९ या दोन्ही भूखंडांसाठी गोईसू रिॲलिटी प्रा.लि. (सुमिटोमो रिॲलिटी अँड डेव्हलपमेंट लि., जपानची भारतीय उपकंपनी) ने सर्वोच्च बोली लावली होती. तसेच सी-८० या अर्लीगा इको स्पेस बिझीनेस पार्क व स्क्लोस चाणक्य प्रा. लि. यांच्या संयुक्त भागीदारीने सर्वोच्च बोली लावली होती. प्लॉट सी-१३ या भूखंडाच ७,०७१.९० वर्ग मीटर क्षेत्रफळ असून₹ ९७४.५१ आरक्षित किंमत होती. लावमध्ये या प्लॉटच्या बोलीत ₹१,३६०.४८ किंमत मिळाली. प्लॉट सी-१९ या भूखंडाचे ६,०९६.६७ वर्ग मीटर क्षेत्रफळ असून ₹८४०.१२ ही आरक्षित किंमत होती. लिलावमध्ये या प्लॉटला ₹१,१७७.८६ रक्कम मिळाली. तसेच, सी-८० या भूखंडाचे क्षेत्रफळ ८,४११.८८ असून आरक्षित किंमत ₹१,१५९.१६ होती. लिलावमध्ये या प्लॉटला ₹१,३०२.१६ रुपये बोली मि ळाली.या तीन भूखंडांच्या भाडेपट्ट्यामुळे एमएमआरडीएला एकूण ₹३,८४०.४९ कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले असून, जवळपास १५ हजार हाय-टेक नोकऱ्यांची निर्मिती होण्याची अपेक्षा आहेवर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या (डब्ल्यूईएफ) ५५व्या वार्षिक बैठकीत दरम्यान एमएम आरडीएने सुमिटोमो व ब्रूकफिल्ड या कंपन्यांसोबत अनुक्रमे युएसडी ५ अब्ज व युएसडी १२ अब्ज गुंतवणुकीच्या करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

## जिल्ह्यात वाघ-बिबट्या पुन्हा आढळले

### अपसिंगा शिवारात वाघाची तर परंडा येथे बिबट्याची दहशत

आरंभ मराठी | धाराशिव

तब्बल दीड महिन्यानंतर जिल्ह्यात वाघ आणि बिबट्याने पुन्हा एकदा दहशत निर्माण केली आहे. वाघाने अपसिंग शिवारात तर बिबट्याने परंडा तालुक्यातील ब्रम्हगाव शिवारात बस्तान बसवले आहे. गेल्या दीड महिन्यांपासून वाघ आणि बिबट्याने शिकार केलेली नव्हती. मागील महिन्यात तुळजापूर तालुक्यात बिबट्याने एका शेतकऱ्यावर हल्ला केल्यानंतर वाघ आणि बिबट्या दोघेही गायब झालेले होते. मात्र दिनांक १ जून रोजी ढेबरेवाडी शिवारात वाघाचे ठसे आढळून आले. वनविभागाने त्या ठिकाणी पाहणी करून खात्री केल्यानंतर हे वाघाचेच ठसे असल्याचे स्पष्ट झाले. ढेबरेवाडी शिवारात वाघाने पाळीव जनावराची शिकार मात्र केल्याची घटना समोर आलेली नाही. मंगळवारी (दि.३) वाघाचे ठसे तुळजापूर तालुक्यातील अपसिंगा शिवारात आढळून आले. वनविभागाच्या पथकाने त्या ठिकाणी जाऊन हे ठसे वाघाचेच आहेत का याची पाहणी केली. अपसिंगा शिवारात देखील वाघाने पाळीव जनावराची शिकार केली नाही. दुसरीकडे परंडा तालुक्यातील ब्रम्हगाव शिवारात हिंगणकर वस्ती येथे म्हशीच्या रेडकावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना ३१ मे रोजी घडली. दोन महिन्यांपूर्वी परंडा तालुक्यातील कपिलापुरी येथे बिबट्याला जेरबंद केल्यानंतर शेतकऱ्यांची भीती काही प्रमाणात कमी झाली होती. परंतु, बिबट्याने पुन्हा शिकार केल्याने शेतकरी पुन्हा धास्तावले आहेत. मागील महिन्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या मान्सूनपूर्व पावसाने परिसरातील ऊसाची वाढ मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामुळे वाघ आणि बिबट्याला लपण्यासाठी भरपूर जागा उपलब्ध असून, शेतकऱ्यांनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे.





### रेस्क्यू टीम इतक्यात येणार नाही

वाघाचा वावर अपसिंगा शिवारात असल्याची माहिती आहे. वनविभागाचे पथक त्या ठिकाणी पाहणी करण्यास गेले आहे. वाघाला पकडण्यासाठी आलेली रेस्क्यू टीम परत गेलेली असून, इतक्यात ती येणार नाही. शेतकऱ्यांनी शेतात विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

–बी. ए. पोळ
विभागीय वन अधिकारी

## खड्ड्यात पडून दोन बालकांचा मृत्यू

### मुरूममधील दुर्घटना: शहरात संताप आणि हळहळ

आरंभ मराठी | मुरुम

शहरालगत असलेल्या गणेशनगर ग्रामपंचायत हद्दीतील महामुनी फ्लॉटिंगच्या मागील बाजूस असलेल्या खोल व पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून दोन बालकांचा मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना मंगळवारी (३ जून) दुपारी घडली. ही घटना संपूर्ण गावाला हादरवून टाकणारी ठरली आहे. अमित बाळू राठोड (११, इयत्ता पाचवी) आणि सुरज अर्जुन पवार ( १२, इयत्ता सहावी) अशी मृत्यू पावलेल्या मुलांची नावे असून, दोघेही एकमेकांचे मित्र होते.प्राथमिक माहितीनुसार, दुपारच्या सुमारास अमित आणि सुरज हे दोघे मित्र खेळता खेळता महामुनी फ्लॉटिंगच्या मागील बाजूस असलेल्या खड्ड्याजवळ गेले. सदर खड्डा पूर्वी खोदलेला असून त्यात पावसाचे व साचलेले पाणी भरलेले होते. पाण्याची खोली आणि धोका न लक्षात घेता त्यांनी पोहण्यासाठी पाण्यात उतरण्याचा प्रयत्न केला. मात्र खोल पाण्याचा अंदाज न आल्यामुळे दोघेही बुडाले. सायंकाळच्या सुमारास शेतीचे कामे करून घराकडे परतणाऱ्या काही महिलांना खड्ड्याजवळ कपडे ठेवलेले दिसले. त्यांच्या शंकेने त्यांनी हे कपडे उचलून घेत ग्रामस्थांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. खड्ड्यात एक मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसल्याने दुसरा मृतदेहही आत असण्याची शक्यता लक्षात घेऊन युवकांनी पाण्यात उतरून शोध घेतला.



अखेरीस दोघांचेही मृतदेह बाहेर काढून तातडीने मुरुम ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना रुग्णालयात आणण्यापूर्वीच मृत घोषित केले.अमित हा मजुरी करून घर चालवणाऱ्या बाळू राठोड यांचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या पाठीमागे एक बहीण आहे. सुरज पवार हा अर्जुन पवार यांचा एकुलता एक मुलगा होता व त्याच्या पाठीमागे दोन बहिणी आहेत. दोन्ही कुटुंबांनी आपले आधारस्तंभ गमावले असून परिसरात शोककळा पसरली आहे. घरातील प्रत्येक व्यक्ती आणि ग्रामस्थ अश्रूंना वाट मोकळी करून देत होते. घटनेची माहिती मिळताच मुरुम पोलीस ठाण्याचे पीएसआय नवनाथ गाडेकर, पी. बी. पवार, कटोरे यांच्यासह इतर कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.



त्यांनी घटनेचा पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले.ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश अर्दाळे, डॉ. मयूर गंगासागरे, शबाना मुल्ला, शिल्पा हिरवे, आकाश चव्हाण, रत्नदीप घोसले, संदीप बाबळसुरे आदींनी तात्काळ कामकाज हाताळत योग्य वैद्यकीय प्रक्रिया पार पाडली. ही दुर्दैवी घटना संपूर्ण गावाला अंतर्मुख करणारी आहे. लहानग्यांचा असा अकाली मृत्यू कुणालाही अस्वस्थ करणारा आहे. दु:खाच्या या काळात संपूर्ण समाजाने एकजुटीने या कुटुंबांना आधार द्यावा व भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सजग राहण्याची गरज आहे.

## गायकांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या बहाण्याने ४० हजारांची फसवणूक

आरंभ मराठी / धाराशिव

गायकांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या बहाण्याने पैसे घेऊन ४० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना धाराशिव शहरात घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी सुजित कैलास सरकाळे (रा. समर्थ नगर धाराशिव) यांनी दिनांक २५ फेब्रुवारी ते १ मार्च २०२५ दरम्यान रामकृष्ण पेट्रोलपंपासमोर धाराशिव येथे फिर्यादी प्रसेनजीत धनंजय शिंगाडे (वय २७ रा. क्रांतीचौक भिमनगर धाराशिव) यांना आरोपीने गायकांच्या कार्यक्रमाचे नियोजन करून देतो असे खोटे सांगून शिंगाडे यांच्याकडून फोन पे वरुन ४०,००० घेतले. मात्र ठरल्याप्रमाणे त्यांच्या वडलांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात गायकांचे नियोजन केले नाही. शिवाय शिंगाडे यांच्याकडून घेतलेले ४० हजार रुपये देखील परत न करता फसवणूक केली. प्रसेनजीत शिंगाडे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथेभा.न्या.सं.कलम ३१६(२), ३१८(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## ॲट्रॉसिटीची प्रकरणे तातडीने निकालात काढून पीडितांना न्याय द्या

### आढावा बैठकीत जिल्हाधिकारी पुजार यांच्या सूचना

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी सोम वारी (दि.२) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अर्थात ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत घडलेल्या प्रकरणांचा आढावा घेतला. या बैठकीला अपर पोलीस अधीक्षक अशफत आमना, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, सहाय्यक संचालक सरकारी अभियोक्ता पंडित जाधव व जिल्हा सरकारी वकील महेंद्र देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. बोलताना पुजार म्हणाले की, ॲट्रॉसिटी प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात यावी. पीडितांना वेळेत मदत करून त्यांना न्याय मिळवून द्यावा. या कायद्याबाबत जनजागृती करण्यात यावी असे त्यांनी सांगितले. सहाय्यक आयुक्त अरवत यांनी सांगितले की, मार्च २०२५ अखेर पोलीस तपासावर असलेल्या ४० प्रकरणापैकी ६० दिवसांची मुदत संपलेली १७ प्रकरणे होती. त्यापैकी ११ प्रकरणांचा दोषारोप अहवाल दाखल करण्यात आलेला नाही. ६ मुदत संपलेल्या प्रकरणांचा दोषारोप अहवाल दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. सन २०२४-२५ वर्षात एप्रिल २०२५ अखेर ॲट्रॉसिटी कायदयाअंतर्गत घडलेल्या गुन्ह्यांची माहिती यावेळी देण्यात आली. यामध्ये ४ खून, ६६ जातीवाचक शिवीगाळीची प्रकरणे, विनयभंगाची २५, बलात्काराची १४ आणि इतर १२ गुन्ह्याचा समावेश असून अशी एकूण १२१ गुन्हे या कायद्याअंतर्गत घडली. न्यायालयात ७८ प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करण्यात आली. २६ प्रकरणे पोलीस तपासार प्रलंबित असून पोलीस स्तरावर निकाली काढण्यात



आलेल्या प्रकरणांची संख्या १७ इतकी आहे. एप्रिल २०२५ या महिन्यात एकूण १४ गुन्ह्याची प्रकरणे घडली. यामध्ये ८ जातीवाचक शिवीगाळ, विनयभंग -२, बलात्काराची २ प्रकरणे व इतर दोन गुन्ह्यांचा समावेश आहे अशी माहिती अरवत यांनी यावेळी दिली.

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत संकेतस्थळावर नोंदणी करण्यास वाढीव मुदत नाही; पात्र लाभार्थी वंचित राहण्याची शक्यता

आरंभ मराठी | तेर

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत नोंदणीची मुदत दिनांक ३१ मे २०२५ रोजी पर्यंत जाहीर करण्यात आली होती.परंतु संकेतस्थळ व्यवस्थित न चालल्याने अनेक पात्र लाभार्थी नोंदणी पासून वंचित राहिले आहेत. मुदत संपून गेली तरीही नागरीक ऑनलाइन करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात खेटे मारत आहेत. परंतु संकेतस्थळावर जुनीच तारीख असल्याने कागदपत्रे अपलोड होत नाहीत. गरिबांना घरकुल मिळणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे. अशा पात्र लोकांकडे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे जॉब कार्ड नाहीत, मोबाइल नाहीत, मोबाईल वर कागदपत्रे अपलोड करायचे म्हणले तर पुरेसे ज्ञान नाही, नेटवर्क प्रॉब्लेम अशा अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. मुदतवाढ मिळेल या अपेक्षेने वृद्ध, पुरुष ,महिला ग्रामपंचायतकडे



खेटे मारताना दिसत आहेत. अनेक गरजू गरीब नागरीक आवास योजनेमध्ये पात्र असणारे कुटुंब या योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.पंतप्रधान आवास योजनेमध्ये समाविष्टहोण्यासाठीमहाराष्ट्रातील कुटुंबांना संकेतस्थळावर नोंदणी करण्यासाठी जुनी ३१ मे ही तारीख येत असल्याने कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मोठी अडचण ठरत आहे.एकंदरीत वाढीव मुदत मिळेल का नाही या बाबत संभ्रमच आहे. तालुक्यातील अनेक ग्रामसेवक ,ग्रामविकास अधिकारी यांना याबाबत विचारणा केली असता अजूनतरी मुदतवाढीचे काहीच आदेश नसल्याचे त्यांनी सांगितले.

CMYK

# 'ही' मानसिकता बदलायला हवी

दिनांक १६ मे रोजी पुण्यातील वैष्णवी हगवणे या विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या (?) केली, हे वृत्त प्रसारित होताच राज्यभर एकच खळबळ उडाली. या वृत्ताची शाई वाळते ना वाळते, तोच नाशकातील उच्चभ्रू समजल्या जाणा-या गंगापूररोड परिसरातील भक्ती गुजराथी या विवाहितेनेही आपली जीवनयात्रा संपवली. अर्थात, रोजच कितीतरी वैष्णवी, भक्ती या जगण्याची ईच्छा असूनही नाईलाजाने आयुष्य संपवितात. या मागचे एकमेव कारण म्हणजे, पैशांसाठी सासू , सासरा, नवरा, नणंद, दीर यांच्याकडून होणारा छळ. 'हुंडाबळी' हा सामाजिक प्रश्न किंवा विषय आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. परंतु, वैष्णवी हगवणेबाबत मात्र अजूनही रोज बातम्या आणि चर्चासत्र चालू आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे, ती राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजेंद्र हगवणे यांची सून होती. म्हणून आपल्या स्वार्थी आणि मतलबी कारभा-यांनी या दुर्दैवी घटनेला राजकीय स्वरूप दिले. अनेक नेत्यांनी वैष्णवीच्या आई-वडिलांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन(?) केले. पण, भक्तीच्या घरी साधे स्थानिक नेते तरी गेले का? वैष्णवीने एकदा आपले जीवन संपविले. पण, राजकीय नेते मात्र वाट्टेल तशा टीका-टीपण्णी करून रोज तिला मारत आहेत, याचे वाईट वाटते.हगवणे कुटुंबियांनी वैष्णवीचा बळी घेऊन आपल्या आडनावाप्रमाणेच अतिशय घाणेरडे कृत्य केले आहे. संतापजनक बाब म्हणजे, सासू आणि नणंद यांनी स्त्री या शब्दाला काळिमा फासला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. हगवणे कुटुंबिय किती लालची आणि नीच आहे, हे रोज प्रसारित होणा-या बातम्यांवरून समजतच आहे. अर्थात, बैलासमोर लाखो रुपये देऊन गौतमी पाटीलला नाचवणा-या या 'बैल' बुध्दीच्या कुटुंबाकडून काय अपेक्षा ठेवणार? सुनेचा जीव घेऊन मटणावर ताव मारणा-या आणि आता आपण निर्दोष आहे, असा कांगावा करण्यासाठी तिचे चारित्र्यहनन करणा-या या सर्व नराधमांना लवकरात लवकर आणि अत्यंत कडक शासन व्हायला हवे. पण, ते होईल की नाही, याचीही शंका वाटते. कारण, हत्येचे कलम न लावता फक्त आत्महत्येस प्रवृत्त केल्याचाच गुन्हा दाखल केला आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेक-यांना आतापर्यंत शिक्षा होणे गरजेचे होते. पण, ते झाले नाही. असाच वेळकाढूपणा या प्रकरणात झाल्यास आश्चर्य वाटायला नको. कारण हेही प्रकरण 'हायप्रोफाईल' आणि राजकारणाशी संबंधित आहे. वैष्णवीसारख्या ज्या कोणी विवाहिता नाईलाजाने आपले जीवन संपवतात. त्याला सासरची लालची मंडळी तर जबाबदार असतेच. पण, माहेरची माणसे आणि समाजही जबाबदार असतो, असे म्हटल्यास चुकीचे ठरू नये. कारण, आपल्या मुलीचा छळ होतो याची कल्पना आई-वडिलांना असते. मुलीला सासरी जायची ईच्छा नसतानाही 'समाज काय म्हणेल'? या खोट्या प्रतिष्ठेपाई; आणि



'मुलीची माहेरवरुन डोली निघते तर, सासरवरुन अर्थी' या बुरसटलेल्या विचारापाई अक्षरश: तिला स्वत:च्या हाताने मृत्युच्या खाईत लोटतात. जग खुप आधुनिक झाले आहे. मानवाने चंद्रालाही आता गवसणी घातली आहे. तेव्हा आपणही बुरसटलेले विचार सोडून आधुनिक विचारांची कास धरणे ही काळाची गरज आहे. मुलगा म्हणजे, वंशाचा दिवा समजून त्याचे धुम धडाक्यात स्वागत केले जाते. परंतु, मुलीने जन्म घेतला तर 'पणती' किंवा 'पराया धन' म्हणत नाके मुरडली जातात. प्रसंगी 'नकोशी' समजून या जगात येण्याआधीच या निष्पाप जीवाला, त्याचा काहीही गुन्हा नसताना गळा घोटणारे नराधम आई-बाप(?) आजही या समाजात आहेत. ही विकृत मानसिकताही बदलणे गरजेचे आहे. तसेच समाजानेही पतीपासून विभक्त राहणा-या स्त्रीकडे बघण्याची दृष्टी बदलून तिचा सन्मान करायला हवा. थोडक्यात, माहेर आणि समाजपीडित मुलींच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिल्यास अनेक पीडित मुलींचे हकनाक बळी जाणार नाहीत. परंतु अशा बुरसटलेल्या, अंधश्रद्ध विचारसरणीला छेद देणारे काही मोठ्या मनाचे माता-पिताही या समाजात आहेत. काही महिन्यांपूर्वी एक बातमी वाचण्यात आली होती. तिचा उल्लेख करणे येथे महत्त्वाचे वाटते. झारखंडच्या रांची येथील प्रेम गुप्ता यांनी आपली फॅशन डिझाईनर कन्या साक्षी हिचा विवाह वीज विभागात सहायक अभियंता म्हणून कार्यरत असणा-या सचिनकुमार नामक युवकाशी मोठ्या धुमधडाक्यात लावला. दोघेही उच्चशिक्षित आणि सुशिक्षित परिवारातील होते. दुर्दैवाने काही महिन्यांतच साक्षीचा शारिरीक आणि मानसिक छळ सुरू झाला. सचिनने पहिले एक लग्न झाल्याचे लपवून ठेवले होते. साक्षीने याचा जाब विचारला असता, तिला मारहाण करून भाड्याच्या एका खोलीत डांबण्यात आले. साक्षीने हार न मानता सोशल मीडियावर आपली कथा आणि व्यथा मांडली. पोलिसांनी कारवाईचा बडगा दाखवत साक्षीची सुटका केली. याच दरम्यान गुप्ता दुर्दैवाने कर्करोगाशी झुंज देत होते. पण ते खचलेही नाही आणि डगमगले तर मुळीच नाही. ते तडक साक्षीच्या घरी आले. कोणाच्याही हाता-पाया पडण्याच्या भानगडीत न पडता, त्यांनी ऐन नवरात्रीत 'लक्ष्मी'ला घराबाहेर काढणा-या नराधमांना धडा शिकवण्यासाठी आपल्या लाडक्या लेकीला बॅंडबाजा वाजवत, फटाक्यांची आतषबाजी करत अगदी वाजत-गाजत घरी आणले. दिखावू इज्जतीचे भांडवल करून, छळ होत असतानाही सासरी राहण्यासाठी दबाव टाकणा-या आई-बापांच्या आणि समाजाच्या 'डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी' घटना, असे या घटनेचे वर्णन केल्यास चुकीचे ठरू नये. इतर पीडित मुलींच्या आई-वडिलांनी यातून काही बोध घेतला आणि मुलीच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले तर, अनेक पीडित मुलींचे हकनाक बळी जाणार नाहीत.अन्यथा, उद्या वैष्णवी आणि भक्तीच्या जागी अजून कोणीतरी असेल; आणि हे दुष्टचक्र असेच चालू राहील.

प्रदीप खोलमकर,
नाशिक.
मो.८७६७५९२९८०

# वाढते रस्ते अपघात आणि गांभीर्य



देशात युद्ध दहशतवाद आणि नक्षलवादापेक्षा रस्ते अपघातात जास्त मृत्यू होतात.असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी काही दिवसांपूर्वी व्यक्त केले होते.देशात प्रतिवर्षी पाच लाख रस्ते अपघात होतात. त्यामध्ये १.५ लाख लोकांचा मृत्यू होतो.तर ३ लाख लोकं अपघातात जखमी होतात. एका अहवालानुसार देशात प्रत्येक तासाला ५३अपघात होतात. यात १९ लोकांचा मृत्यू होतो,तर काही जखमी सुद्धा होतात. एकूण रस्ता अपघातांच्या तुलनेत ८५ टक्के अपघात वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे होतात. तर १५ टक्के अपघात हे प्रशासनाच्या चुकांमुळे होतात.यामुळे देशात सकल राष्ट्रीय उत्पादनाचे ( जीडीपी ) ३ टक्के नुकसान होते. रस्ते अपघातात अशावेळी चालकचं बेजबाबदार ठरतात असे नव्हे तर, रस्ता अभियांत्रिकी सुद्धा चुकल्याचे अनेक उदाहरणे देशात आहेत.रस्ते अपघातांची असंख्य कारणे आहेत. बेलगाम वाहने चालविणे, निष्काळजीपणे वाहन चालविणे, मद्यप्राशन करून वाहन चालविणे, वाहतूक नियमांचे कुठलेही पालन न करणे. सध्या राज्यात बहुचर्चित असलेल्या 'हिट अँड रन' प्रकरणाची पुनरावृत्ती नियमित होत असते. दोन दिवसांपूर्वी पुण्यातील पिंपरी चिंचवड येथे एका ऑडी कारने दुचाकी स्वाराला धडक देऊन तो बॉनेटवर फेकला गेला. त्याला तीन किलोमीटर फरपटत नेल्याचा व्हिडिओ सोशल मीडिया व्हायरल सुद्धा झाला आहे. रस्ते आणि वाहतूक मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २०२२ मध्ये एकूण अपघातापैकी ७२. ३ टक्के अपघात वेगाने वाहन चालविण्याने झाले होते.लोक जखमी झाले आहेत. २०२१ च्या वेगाने वाहन चालविण्याच्या घटनेची तुलना केल्यास एकूण अपघातामध्ये १२. ८ टक्के तर,मृत्यूमध्ये ११. ८ टक्के आणि जखमेच्या संख्येत १५. २ टक्के एवढी वाढ झाली आहे. मागील आठवड्यात नागपूर जिल्ह्यातील बोर अभयरण्याच्या सहलीसाठी जाणारी विद्यार्थ्यांची बस दरीत कोसळली होती. या घरात एका विद्यार्थिनीचा मृत्यू तर अनेक विद्यार्थी जखमी झाले होते. तर दुसऱ्या मोठ्या एका दुर्घटनेत गोंदिया जिल्ह्यातील डव्वा गावाजवळ शिवशाही बस एका दुचाकीला ओव्हरटेक करण्याच्या नादात पलटी झाली होती.या बस मधील अकरा प्रवासी ठार तर १९ प्रवासी गंभीर जखमी झाले होते.या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळूहळू व्यक्त करण्यात आली होती.क्षुल्लक कारणाने सुद्धा मोठे अपघात होतात हे शिवशाही बस दुर्घटनेतून व्यक्त होते.आज देशातील असंख्य मार्गावर चुकीच्या दिशेने वाहन चालविण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यावर फारसी कडक कारवाई होताना दिसत नाही. परिणामी अपघातांची शक्यता अधिक बळावते. दिवसेंदिवस वाढणारे अपघात कमी करण्यासाठी सरकार प्रयत्नशील दिसते. परंतु त्याची अंमलबजावणी त्वरित व्हायला हवी. वाढते रस्ते अपघात उपाययोजनेचा एक भाग म्हणून स्टॉकहोम करारातील बांधीलकीनुसार सरकारने २०३० पर्यंत रस्त्यावरील मृत्यू कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने '' ४ ई '' म्हणजे एज्युकेशन ( शिक्षण ) इंजीनियरिंग (अभियांत्रिकी )( रस्ते आणि वाहने दोन्ही) एन्फोर्समेंट( अंमलबजावणी) आणि इमर्जन्सी केअर ( आपत्कालीन सेवा ) असा दृष्टिकोन स्वीकारला आहे. अशा उपायोजनेने रस्ते अपघात कमी होण्यास हातभार लागेल व मानवी प्राणहानी ठळेल. अशी अपेक्षा बाळगूया.!



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जिल्हा,यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# लिव्ह इनमध्ये राहणाऱ्या कोल्हापुरातील तरुणीचा खून

आरंभ मराठी | कोल्हापूर

लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहूनही लग्नाला नकार देणाऱ्या कसबा बावडा येथील युवतीचा धारधार शस्त्राने भोसकून अमानुषपणे खून केल्याची थरारक घटना आज दुपारी सरसोबतवाडी (ता. करवीर) येथे घडली. समीक्षा भारत नरसिंगे ऊर्फ बागडी (वय २३, रा. जयभवानी गल्ली) असे खून झालेल्या युवतीचे तिचे नाव आहे. खुनाच्या घटनेनंतर सतीश मारुती यादव (वय २५, रा. शिवाजी पेठ, कोल्हापूर) हा पसार झाला आहे. संशयिताच्या शोधासाठी गांधीनगरसह स्थानिक गुन्हे अन्वेषणची संयुक्त पथके ठिकठिकाणी रवाना झाली आहेत. या घटनेमुळे सरनोबतवाडीसह मणेर मळा हादरला आहे. शहरात खळबळ माजली आहे.युवतीचा खून झाल्याची बातमी शहरासह परिसरात वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळासह शासकीय रुग्णालयात नातेवाईकांसह नागरिकांची गर्दी झाली होती. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या.तरुणाने तरुणीच्या छातीत चाकू खुपसून खून केल्याने चाकू तरुणीच्या बरगडीतच अडकल्याची प्राथमिक माहिती आहे. दोघे तरुण-तरुणी एकाच इव्हेंट कंपनीत काम करत होते. तसेच ते दोघे लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहत होते. तरुणाने तरुणीकडे लग्नाची मागणी घातली होती, असे समजते. त्यातून त्याने हे कृत्य केल्याचे सांगितले जात आहे.

# लोक काय म्हणतील?

लोक काय म्हणतील?
या प्रश्नाची भीती ज्यांना
ते वाईट वागत नाहीत
वाईटांची संगत धरत नाहीत
खोटे बोलत नाहीत की
वाईट कामे करत नाहीत
व्यसनांपासून दूर राहतात
चारित्र्याला जपतात
प्रामाणिकपणे जगतात
कष्टाची भाकर खातात
नात्यांना सांभाळतात
प्रपंच नेटका करतात
लोक काय म्हणतील?
हा प्रश्न ज्यांना भिती घालत नाही
ते भ्रष्टाचारात आघाडीवर
कर्तव्यात मात्र पिछाडीवर
चिरीमिरी व लाच घेतात
वाईट वागतात वाईट बोलतात
व्याभिचार त्यांच्या आवडीचा
आर्थिक व्यवहार सवडीचा
सगळी व्यसने करतात
अप्रामाणिक जगतात
कष्ट त्यांना आवडत नाहीत
नात्यांना जपत नाहीत
लोकांना कुठे वेळ आहे?
तुमचे सत्कर्म पाहायला
चांगुलपणा ओळखायला
तुम्हाला नावे ठेवायला
तुमचे कर्तृत्व जाणायला
तुमच्याकडे लक्ष द्यायला
लोक काय म्हणतील?
हा प्रश्न तातडीने फेकून द्या

# विचारा स्वत:ला

चारचौघात वावरताना
नावे ठेवतो दुसऱ्याला
आपण आहोत कसे?
विचारा स्वत:ला
हा रागीट तो तापट
हा वाईट तो चांगला
आपला स्वभाव कसा?
विचारा स्वत:ला
हा भांडकुदळ तो कामचुकार
हा स्वार्थी तो हपापलेला
आपण वागतो कसे?
विचार स्वत:ला
नातलग असले मित्र तसले
एक नाही कामाचा
धावतो का इतरांच्या मदतीला?
विचारा स्वत:ला
शेजारी असा गावकरी तसे
कंजूस सगळे व्यवहाराला
आपण किती मोठ्या मनाचे?
विचारा स्वत:ला
जातभाई स्वार्थी निव्वळ
सहकारी बोलतात पोकळ
आपण कसे आहोत वागायला?
विचारा स्वत:ला
चारित्र्यहीन लोक सगळे
असे शिंतोडे उडवता कशाला
स्वत: आहे धुतल्या
तांदळासारखा?
विचारा स्वत:ला
मीपणा संपून जावा
लोकांसोबत बोलताना
फक्त आपणच चांगले कसे?
विचारा स्वत:ला

– बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर..९७३०९३९७३२९

# एका अपयशाने आयुष्य थांबत नाही..

प्रत्येकाचे आयुष्यात ध्येय ठरलेले असते.ते ध्येय गाठण्यासाठी मनापासून खूप मेहनत केली जाते. प्रयत्न करुनही कधी कधी आपल्या वाट्याला अपयश येते.त्यावेळी माणूस मनातून निराश होतो.दु:खी होतो. खचून जातो.अशावेळी खचून न जाता ,अपयशाला कवटाळत न बसता पुन्हा नव्याने उभे रहायचे असते.त्यासाठी स्वत: बद्दल सकारात्मक विचार करायला हवा.खरं तर अपयश तुमची परीक्षाच घेत असते.अपयशात तुम्ही स्वत: ला सावरुन खंबीरपणे कशा प्रकारे पुढे जाता हे महत्वाचे असते. ज्यावेळी आपला एखादा मार्ग बंद होतो त्यावेळी दुसरा मार्ग आपल्याला खुला होतो.म्हणजेच एखाद्या अपयशाने आपले आयुष्य थांबत नाही किंवा सगळ्या वाटाही बंद होत नाहीत. अपयशातूनच माणूस घडतो.जिद्दी बनतो.नवी वाट शोधून तो पुढे चालत





राहतो.अपयशाच्या वेळी स्वत: वर विश्वास ठेवा.आपल्या चुका शोधून काढा.पुन्हा त्या चुका होऊ नयेत यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा. थॉमस अल्वा एडिसनला विजेच्या दिव्याचा शोध लावताना नऊशे नव्यानऊ वेळा अपयश आले.एडिसन थांबला नाही. एडिसन प्रयत्न करत राहिला आणि अखेरीस हजाराव्या प्रयत्नात तो यशस्वी झाला.म्हणजे माणसाने प्रयत्न सोडता कामा नयेत. ज्याच्या वाट्याला जेवढे मोठे अपयश येते किंवा संघर्ष येतो तेवढे त्याला खूप मोठे यश मिळते.त्यामुळे अपयशाने घाबरु नका.मनात भीती घेऊ नका. स्वत: ला कमजोर न समजता पुन्हा भरारी घ्या.आयुष्यात असे अनेक वेळा अपयशाचे प्रसंग येतात.त्याला धैर्याने आणि संयमाने तोंड देत पुढे जावे. पुढच्या मार्गावर यश तुमची वाट पाहत असेल.त्यावेळी तुमच्या परिश्रमाचे चीज झाले असेल.यश मिळाल्यानंतरचा तुमचा आनंद हा अवर्णनीय असेल.त्यासाठी तुम्हाला अपयशाविरुद्धची लढाई कणखरतेने लढावी लागेल.यासाठी तुमच्या जवळ सातत्य,चिकाटी,संयम आणि कठोर परिश्रम ही शस्त्रे असायला हवीत.मग तुम्ही जिंकलाच म्हणून समजा.

लक्ष्मण जगताप
(लेखक शिक्षक व सुपदेशक आहेत.)

# व्यसनमुक्तीची वाट – नवजीवनाची सुरूवात

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेकजण अज्ञात संकटांपासून सुटका शोधताना व्यसनांच्या आहारी जातात. सुरुवातीला क्षणिक समाधान देणाऱ्या या व्यसनांचा परिणाम मात्र दीर्घकाळ टिकणारा आणि गंभीर असतो. गेली दोन वर्षे मी येडाई व्यसनमुक्ती केंद्रात काम करत असून, मी अनेक रुग्णांचे व्यसनातून बाहेर पडण्याचे संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवास पाहिले आहेत.



## व्यसनाचे शरीरावर होणारे परिणाम:

व्यसन कोणतेही असो दारू, गांजा, तंबाखू, ब्राऊन शुगर, इंजेक्शन यांचा थेट परिणाम आपल्या शरीरावर होतो. यामुळे यकृत निकामी होणे, फुफ्फुसे खराब होणे, रक्तदाब व हृदयविकार, स्नायू अशक्तपणा, अन्न न रुचणे, वजन घटणे अशा अनेक शारीरिक समस्यांचा सामना करावा लागतो. काही वेळा हे परिणाम कायमचे असून, मृत्यूही ओढवतो.

## मानसिक परिणाम:

व्यसन शरीरापुरतेच मर्यादित राहत नाही, तर ते मनावरही खोल परिणाम करते. नैराश्य, चिडचिड, आत्महत्येचे विचार, स्मरणशक्ती कमी होणे, एकाग्रतेचा अभाव हे मानसिक त्रास होतात. काही वेळा रुग्ण वास्तव आणि कल्पना यात फरक करू शकत नाहीत.

## सामाजिक नुकसान:

एक व्यसनी व्यक्ती समाजात आपली प्रतिमा गमावतो. त्याच्याबद्दल समाजात अविश्वास, उपेक्षा व नकारात्मक दृष्टिकोन तयार होतो. नोकरी जाणे, मैत्री तुटणे, समाजात बेअब्रू होणे ही या व्यसनाच्या सामाजिक नुकसानीची

## कौटुंबिक नुकसान:

व्यसनामुळे कुटुंबातील नात्यांवर फार मोठा परिणाम होतो. पती-पत्नीतील वाद, मुलांवर होणारा मानसिक ताण, आर्थिक अडचणी, घरात वादविवाद व हिंसाचार हे सगळे या एकाच व्यसनाच्या मुळे घडते. कुटुंबाला असहाय वाटू लागते व अनेक वेळा रुग्णाला एकटं पाडलं जातं.

## येडाई व्यसनमुक्ती केंद्रात उपचार:

येडाई व्यसनमुक्ती केंद्र हे अशा रुग्णांसाठी एक आशेचं किरण आहे. येथे वैद्यकीय उपचारांसोबतच समुपदेशन, व्यायाम, ध्यानधारणा, योगा, कौशल्यविकास वर्ग, धार्मिक/आध्यात्मिक कार्यक्रम घेतले जातात. आमचं उद्दिष्ट रुग्णाला शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून पुनर्वसन करणे आहे. येथे आलेला रुग्ण कठीण प्रवासातून जातो, पण सातत्याने त्याचं मनोबल वाढवत, तो हळूहळू व्यसनातून पूर्ण मुक्त होतो आणि पुन्हा नव्या आयुष्याची सुरुवात करतो.

## संदेश:

व्यसन हे आजार आहे गुन्हा नाही. त्यामुळे लाज न बाळगता, धैर्याने पुढे या. येडाई व्यसनमुक्ती केंद्र तुमच्या सोबत आहे. आपण वेळेत उपचार घेतले, तर आयुष्य पुन्हा सुंदर आणि अर्थपूर्ण होऊ शकतं. व्यसनमुक्ती ही संपूर्ण कुटुंबासाठी नवी सुरुवात असते.

''जन्म आपला सुंदर असावा, व्यसनात न गमवावा।
उपचार घेऊन मुक्त व्हा, नव्या जीवनात सामील व्हा!''



कल्पना गौतम कोठावळे
येडाई व्यसनमुक्ती केंद्र येरमाळा
संपर्क:९३७३८४१७७५

# विधी सेवा प्राधिकरण,जस्टीस मिशनच्या वतीने कामगार जागरूकता कार्यक्रम

आरंभ मराठी | धाराशिव

तालुक्यातील उपळा पाटी येथे वीट भट्टीवर विशेष सेल कामगार जागरूकता, असंघटित क्षेत्रातील योजना कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी उपस्थितांना इंटरनॅशनल जस्टीस मिशनच्या शीला पठत, संदेश जोगेराव व असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी कायदेशीर सेवा योजना, २०१५ विशेष सेलचे सदस्य प्रशांत मते, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सुरज डांगे यांनी कामगारांसाठी शासकीय योजनाची माहिती, कामगारांचे वेतन, कामगारांचा कामाचा वेळ, वेठबिगारी, मानवी तस्करी, कामगारासाठी ई श्रम कार्ड,



बांधकाम कामगार कार्यालयातील योजना व बांधकाम कामगार कार्ड, मालकांकडून कामगारांचा छळ होत असेल तर किंवा कामगाराच्या अडचणीसाठी प्राधिकरण कायदेविषयक माहिती पॉम्पलेट महिला व पुरुष ,वृद्ध यांना वाटप करून, मोफत कायदेविषयक सेवा याविषयी जनजागृती करण्यात आली. तसेच कामगारांच्या अडचणी वेळी मदतीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण टोल फ्री क्रमांक १५१०० संपर्क करण्यास सांगितले, यावेळी असंघटित क्षेत्रातील कामगार, वीट भट्टी कामगार उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

## विविध वृत्त

## अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील-नाईकडे यांचा विविध संघटनाकडून सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव येथे नव्याने पदोन्नतीने अपर जिल्हाधिकारी म्हणून रूजू झालेल्या ज्योती पाटील-नाईकडे यांचा मंगळवारी (दि.३) विविध कर्मचारी आणि सामाजिक संघटनाकडून सत्कार करण्यात आला. अनु. जाती,जमाती, वि.जा.भ.ज., इ.मा.व., वि.मा.प्र., शासकीय निमशासकीय अधिकारी, कर्मचारी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य डॉ. बाबासोब आंबेडकर दलित-मित्र, समाजभूषण संघाचे राज्य सचिव दलितमित्र शंकरराव खुने यांनी शाल, पुष्पहार देवून त्यांचा सत्कार केला. यावेळी धाराशिव जिल्हा सरचिटणीस सुधाकर माळाळे, महाराष्ट्र राज्य शिक्षण संघटना समन्वयक प्रकाश घोळवे, कास्ट्राईब संघटनेचे नेते हरिभाऊ बनसोडे, कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे राज्य उपाध्यक्ष दिलीप शितोळे, शिक्षक संघटनेचे सुनिल मुंडे, गजानन वाघमारे, राजू तांबे, मुकुंदराजे निंबाळकर, मुकुंद रायखेलकर, गौतम गायकवाड आदी उपस्थित होते.

## ढाकणी येथील शेतकऱ्याचे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



आरंभ मराठी | पळसप

लातूर तालुक्यातील ढाकणी येथील शेतकरी कालिदास रोहिदास कांबळे व रामदास रोहिदास कांबळे यांनी आपल्या ढाकणी गावातील न्याय प्रविष्ट जमिनीसंबंधी न्याय मिळावा यासाठी लातूर जिल्हाधिकारी कार्यलयासमोर उपोषण सुरू केले आहे . त्यांच्याकडून सांगण्यात आले की, त्यांची ढाकणी ता लातूर येथील शिवारात गट नंबर १२२ मध्ये वडिलोपार्जित जमीन आहे. त्या जमिनी शेजारील जमीन शेजारील शेतकऱ्यांनी विक्री केली आहे. त्यामधील त्यांची ६ गुंठे जमीन बेकायदेशीर रित्या विक्री केल्याची त्यांची तक्रार आहे. हे प्रकरण त्यांनी न्यायालयात दाखल केले आहे. परिणामी हे प्रकरण न्यायललयात का दाखल केले म्हणून मुरूड येथील काही व्यक्तींनी दमदाटी केल्याची तक्रार मुरूड ता लातूर येथील पोलीस ठाण्यात देण्यात आली होती. परंतु याची कसलीच दखल मुरूड पोलीस ठाण्याकडून घेण्यात आली नसल्याने आम्हाला न्याय मिळावा म्हणून जिल्ह्याधिकारी कार्यालयात लेखी तक्रार देऊन न्याय मिळेपर्यंत उपोषण करण्यात येणार असल्याचे ढाकणी येथील शेतकरी कांबळे यांच्याकडून सांगण्यात आले.

## राज्याभिषेक दिनानिमित्त परंडा आयटीआयमध्ये 'कुटुंब प्रबोधन' यावर व्याख्यान

आरंभ मराठी । धाराशिव

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून दिनांक ६ जून २०२५ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये पंचसूत्री परिवर्तन या विषयावर नामवंत विचारवंतांची व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील परंडा येथील कल्याणस्वामी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये 'कुटुंब प्रबोधन' या विषयावर संजय कुलकर्णी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान दिनांक ६ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता संस्थेतच होणार आहे.या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे,असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस.एस.कदम यांनी केले आहे.

## बकरी ईदनिमित्त ७ जून रोजी जिल्ह्यात मद्यविक्रीस बंदी

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात दिनांक ७ जून २०२५ रोजी बकरी ईद (ईद-उल-अझहा) सण साजरा करण्यात येणार आहे. हा सण शांततेत व सुरळीत पार पडावा यासाठी सार्वजनिक शांततेच्या दृष्टीने जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी महत्त्वपूर्ण एक आदेश जारी केला आहे. महाराष्ट्र दारुबंदी कायदा,१९४९ मधील कलम १४२ (१) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी ७ जून २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या किरकोळ देशी व विदेशी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित अनुज्ञप्ती धारकाविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल व अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द केली जाऊ शकते, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# मुरुडच्या भाविकांकडून २४ लाखांची अन्नसेवा चाकरवाडीला रवाना

### ४८० डब्बे तेल, ४७० पोती साखर, ५१ पोती बटाटे आणि २०० किलो मसाल्याचे संकलन

### सद्गुरु माऊलींच्या जयघोषात साहित्य घेऊन जाणाऱ्या वाहनांची मिरवणूक





आरंभ मराठी | मुरुड

श्री क्षेत्र चाकरवाडी (जि. बीड) येथे सदगुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थदिनांक ८ जूनपासून आयोजित आंतरराष्ट्रीय शिवकथा प्रवक्ते पंडीत प्रदीप मिश्रा ( सिहोरवाले ) यांची शिवमहापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताहनिमित्त मुरुड (ता. लातूर) व परिसरातील भाविकांनी एकूण २१ लाख ३१ हजाराची अन्नसेवा दिली. या सेवेतील अन्नधान्य मंगळवारी (दि. ३) चार वाहनांतून चाकरवाडीला रवाना केली. त्यापूर्वी सदगुरु माऊलींच्या जयघोषात या वाहनांची भाविकांच्या हस्ते विधिवत पूजा करून गावातून मिरवणुक काढण्यात आली.यंदा सदगुरु ज्ञानेश्वर माऊली महाराजांचे २५ वे पुण्यस्मरण असून त्यानिमित्त चाकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहासोबत श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. याच सप्ताहात पंडीत प्रदीप मिश्रा (सिहोरवाले) यांची श्री शिवमहापुराण कथा ८ ते १४ जून दरम्यान होणार आहे. ही कथा यंदा कार्यक्रमाचेच प्रमुख आकर्षण असल्याने कथेसाठी पंचक्रोशीतून मोठ्या संख्येने भाविक येणार आहेत. चाकरवाडीला सदगुरु माऊली महाराजांच्या समाधी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी नियमित अन्नछत्र सुरु असते. यंदा श्री शिवमहापुराण कथेसाठी मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे. त्यासाठी ह. भ. प. महादेव (तात्या) महाराज चाकरवाडीकर यांच्या नेतृत्वाखाली भाविकांकडून कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरु आहे. या तयारीत विविध ठिकाणच्या भाविकांनी अन्नसेवा देण्याचे आवाहन महादेव महाराजांनी केले होते. त्याला मुरुड व परिसरातील भाविकांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.मुरुड येथे १० मे रोजी भाविकांसोबत झालेल्या संवादात महादेव महाराजांनी साखर तसेत खाद्यतेल (गोडेतेल) देण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार भाविकांनी एकत्र येत वॉट्स ग्रुप व अन्य माध्यमातून अन्नदान संकलित केले. दानशूर व्यक्तींनी सूचना केल्यानंतर जाग्यावर जाऊन अन्नदान संकलित करण्यासाठी प्रमुख भाविकांनी पुढाकार घेतला. यामुळे वीस दिवसात २१ लाख ३१ हजार रुपये किंमतीचे साहित्य संकलित झाले. यात ४८० तेल डब्बे, ४७० कट्टे साखर, ५१ कट्टे बटाटे, दोन टन मीठ, दोनशे किलो मसाले, तीस किलो जिरे आदी साहित्याचा सम ावेश आहे. हे साहित्य मंगळवारी सकाळी पाच वाहनांतून चाकरवाडीला पाठवण्यात आले. त्यापूर्वी भाविकांच्या सहभागाने भगवे ध्वज लाऊन माऊलींच्या जयघोषात पाचही वाहनांची घुटेनगरपासून आंबेडकर चौकातून छत्रपती शिवाजी चौकमार्गे बालाजी मंदिरापर्यंत भव्य मिरवणुक काढण्यात आली. मिरवणुकी दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. बालाजी मंदिरापासून शिराढोणमार्गे ही वाहने चाकरवाडीला रवाना झाली. महादेव म हाराजांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अन्नसेवेला कमी काळात मोठा प्रतिसाद दिल्याबद्दल श्री सदगुरु माऊली महाराज चाकरवाडीकर भक्त परिवाराचे प्रमुख पदाधिकारी अनिल कापसे, गणेशलाल सोनी, बालाप्रसाद लोहिया, डॉ. सुरेश रणदिवे, सुनिल डोलारे, पंपू शिंदे व सदस्यांनी भाविकांचे आभार मानले आहेत.

## स्व.गोपीनाथ मुंडे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



आरंभ मराठी | परंडा

भाजपाचे ज्येष्ठ नेते स्व. गोपीनाथ मुंडे यांना स्मृतिदिनी परंडा येथे भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते संपर्क कार्यालय, परंडा येथे प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. जहिर चौधरी, माजी तालुकाध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. संतोष सुर्यवंशी, न.प. माजी गटनेते सुबोधसिंह ठाकूर, जिल्हा चिटणीस सुजित परदेशी, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष अविनाश विधाते, ओ.बी.सी. मोर्चा जिल्हा सरचिटणीस ॲड. भालचंद्र औसरे, ओ.बी.सी. मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव पाडुळे, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सारंग घोगरे, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस रामकृष्ण घोडके, ता. उपाध्यक्ष बाबासाहेब जाधव, सरचिटणीस तानाजी पाटील, उद्योजक हनुमंत पाटील, बाळासाहेब गिरी, अर्जुन कोलते, रामदास गुडे, जयंत सायकर, किरण कवटे, प्रभाकर लिमकर, नागेश गर्जे, गौरव पाटील, आदर्श ठाकूर, सुरज काळे, सिध्दीक हन्नुरे, तुषार कोळेकर, समाधान कोळेकर, अमर ठाकूर, अजिम हन्नुरे तसेच इतर मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.नितीन पडवळ यांची अध्यक्षपदी निवड

### विद्या विकास पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांची कार्यकारिणी बिनविरोध जाहीर

आरंभ मराठी | भूम



विद्या विकास पाथरुड सेवक सहकारी पतसंस्था नामांकित संस्थेच्या चेअरमनपदी डॉ. नितीन पडवळ आणि उपाध्यक्षपदी प्रा. गंगाधर काळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. दोन्ही मान्यवरांच्या निवडीबद्दल संस्थेच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी विद्या विकास मंडळ, पाथरुडचे उपाध्यक्ष डी. डी. बोराडे, सहसचिव प्रा. संतोष शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. सत्कार समारंभात बोलताना उपस्थितांनी नवनिर्वाचित चेअरमन डॉ. पडवळ आणि उपाध्यक्ष प्रा. काळे यांच्या कार्यक्षमता, दूरदृष्टी आणि संस्थेप्रती असलेल्या बांधिलकीचे कौतुक केले. या नव्या नेतृत्वामुळे पतसंस्थेच्या कामकाजात अधिक पारदर्शकता, कार्यक्षमतेची वाढ आणि नवोन्मेषी उपक्रमांची अंमलबजावणी होईल,'' असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला. आपल्या मनोगतात डॉ. नितीन पडवळ यांनी सर्व संचालक, पदाधिकारी व सभासदांचे आभार मानले आणि संस्थेचा आर्थिक विकास, सभासदांचे हित आणि व्यावसायिक व्यवस्थापन या त्रिसूत्रीवर काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. उपाध्यक्ष प्रा. गंगाधर काळे यांनीही सहकार्याचे वचन देत संघभावनेने कार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सचिव, संचालक मंडळातील सदस्य, कर्मचारी व विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दोन्ही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत आनंद व्यक्त केला.

## लांजेश्वर येथील निराधारांना ज्ञानेश्वर गीते यांचा आधार, निराधारांचा साडी,टोपी देऊन केला सन्मान

आरंभ मराठी | भूम




भूम तालुक्यातील लांजेश्वर येथे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर गीते यांनी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना निवडीचे पत्र देऊन निराधार महिलांना साडी तर पुरुषांना टोपी टॉवेल देऊन सन्मानित केले. भूम तालुक्यातील आंद्रुड येथील ईट जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य ज्ञानेश्वर गीते यांनी लाजेंश्वर या गावात जाऊन निराधार योजनेचे खरे लाभार्थी असून देखील या योजनेत समाविष्ट झालेला नाही अशा लाभार्थ्यांची यादी करून लागणारे कागदपत्रे तयार केले व स्वखर्चाने लाभार्थ्यांचे प्रस्ताव तयार करून लाभार्थ्यांना मंजुरी पत्र मिळेपर्यंत पाठपुरावा केला. त्यांनी लांजेश्वर येथील वंचित असलेल्या लाभार्थ्यांना लाभ मि ळवून दिला आहे. ज्ञानेश्वर गीते यांनी या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना सांगितले की, ईट जिल्हा परिषद गट अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक गावामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे शासनाचे सार्वत्रिक लाभ असो की वैयक्तिक लाभ असो ते देण्याचा मी प्रयत्न केला असून, यापुढेही करत राहणार असल्याचे सांगितले. आंद्रुड येथील ग्रामपंचायतचे सरपंच व त्यांच्या टीमने लाजेंश्वर येथील लाभार्थ्यांना मंजुरी पत्र देत महिलांना साडी तर पुरुषासाठी टॉवेल, टोपी देऊन वृद्धांचा सन्मान केला आहे. कार्यक्रमा प्रसंगी आंद्रुड ग्रामपंचायतच्या सरपंच वर्षा गीते, उपसरपंच निवृत्ती तावरे तसेच सुग्रीव लिमकर ,संजय लिमकर, मदन भोहीटे, लांजेश्वर येथील अंगद नलावडे, भीमराव गावडे, संजय श्याम नलवडे, चंद्रकांत पवार यांच्यासह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या योजनेसाठी लाजेंश्वर येथील कमलाकर भोईटे व संजय नलवडे, विलास खोसे यांचा देखील मोलाचा वाटा असल्याचे गीते यांनी सांगितले.

## अपर जिल्हाधिकारी ज्योतीताई पाटील यांचा सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव



कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ जिल्हा शाखा धाराशिव यांच्या वतीने धाराशिवच्या अपर जिल्हाधिकारी ज्योतीताई पाटील यांचा धाराशिव जिल्हाध्यक्ष बापु शिंदे, राज्य अतिरिक्त महासचिव हरीभाऊ बनसोडे, संविधान संरक्षण समितीचे अध्यक्ष ॲड. अजित कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण प्राप्त व्ही.एस. गायकवाड यांच्या हस्ते बुके देवून सत्कार करण्यात आला.

## राज्याभिषेक दिनानिमित्त वाशी आयटीआयमध्ये 'कुटुंब प्रबोधन'विषयावर व्याख्यान

आरंभ मराठी | धाराशिव

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने दिनांक ६ जून २०२५ रोजी राज्यभरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नामवंत विचारवंतांची पंचसूत्री परिवर्तन विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत. ही संकल्पना कौशल्य विकास,उद्योजकता,रोजगार व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांची आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील वाशी येथील जैनम ुनी कुलभूषण देशभूषण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये 'कुटुंब प्रबोधन' या विषयावर यशवंत सूर्यवंशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान ६ जून रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.या कार्यक्रम ास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस.एस.कदम यांनी केले आहे.

## सांची प्रतिष्ठानच्या वतीने असंघटित कामगारांसाठी आरोग्य शिबिर

### नायब तहसिलदार महादेव शिंदे यांच्या हस्ते आरोग्य कार्डचे वाटप



आरंभ मराठी | धाराशिव

सांची प्रतिष्ठानच्या वतीने नोंदणीकृत असंघटित बांधकाम कामगारांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये ७० कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शासनाच्या विविध योजनेतील असंघटित बांधकाम कामगारासाठी जी आरोग्य कल्याणकारी योजना आहे त्या योजनेतील बौद्ध नगर,भीमनगर रसूलपुरा भागातील कामगारांची रक्त तपासणी करून यापूर्वी ज्यांचे रक्त तपासून रिपोर्ट आले होते त्यांना औषधोपचार देण्यात आले.शिबिरातील लाभार्थ्यांना नायब तहसिलदार महादेव शिंदे यांच्या हस्ते आरोग्य कार्ड देण्यात आले.या कार्यक्रमास धाराशिवचे नायब तहसिलदार महादेव शिंदे, रूग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतीफ, सामाजिक कार्यकर्ते तथा तालुकास्तरिय बाल संरक्षण समिती सदस्य गणेश वाघमारे, एंजेल प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रसाद बनसोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीचे संग्राम बनसोडे, आसेफभाई पठाण, अजय कांबळे तसेच असंघटित बांधकाम काम गार कल्याणकारी योजना विभागातील सहभागी असलेले डॉ. मोहसीन पल्ला,गौरव राठोड,प्रथमेश डोंगे,तौफिक तांबोळी,शुभम मोहोळकर,आकाश घंटे,राजकुमार कनकुटे सह यांची उपस्थिती होते. आलेल्या मान्यवरांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना गणेश वाघमारे यांनी केली तर सूत्रसंचालन प्रसाद बनसोडे यांनी व आभार प्रमोद हावळे यांनी मानले.

# अमली पदार्थांचे बेकायदेशीर सेवन, विक्री रोखण्यासाठी कठोर निर्णय

### नूतन पोलिस अधीक्षक रितू खोखर यांचा पत्रकारांशी संवाद

आरंभ मराठी | धाराशिव




धाराशिव जिल्ह्यात पोलीस अधीक्षक म्हणून चांगले काम करण्याचा उद्देश ठेवून मी आले असून, यासाठी पत्रकारांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी मित्र आणि मार्गदर्शक बनावे असे आवाहन नवनियुक्त पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर यांनी केले. पोलीस अधीक्षक म्हणून पदभार हाती घेतलेल्या रितू खोखर यांचा सत्कार पत्रकार बांधवांनी केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना खोखर यांनी मनमोकळ्या गप्पा मारत जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पत्रकारांच्या सहकार्याची गरज असल्याचे सांगितले. पोलिसांची जिथे चूक होईल तिथे निश्चितपणे पत्रकारांनी चुका दाखवून देण्याचे देखील त्यांनी आवाहन केले. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असतो, त्यामुळे पोलीस प्रशासन म्हणून काम करताना या चौथ्या स्तंभाची वेळोवेळी गरज पडणार आहे. जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखताना पोलिसांकडून काही त्रुटी होऊ शकतात, परंतु, या त्रुटी मित्र आणि मार्गदर्शक म्हणून पत्रकारांनी दाखवून दिल्यास त्याचा आम्हाला फायदा होईल असेही खोखर यावेळी म्हणाल्या. यावेळी त्यांनी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर महाविद्यालयीन आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम हाती घेतली जाणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यात अंमली पदार्थांचे बेकायदेशीरपणे सेवन आणि विक्री यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन पूर्ण ताकतीने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तुळजापूर येथे वाहतुकीचा नवीन विभाग काढण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. पोलीस अधीक्षक निवासस्थानाच्या परिसरातील वृक्षतोड केल्याच्या वृत्ताचे त्यांनी खंडन करून परिसरातील एकही वृक्ष तोडला नसून, त्यांची फक्त छाटणी केल्याचे त्यांनी सांगितले. परिसरातील काही वृक्ष मोठ्या प्रमाणावर वाढले असून, त्याच्या फांद्या घरावर पडण्याची शक्यता निर्माण झाली होती. तसेच डासांचा उपद्रव देखील वाढल्यामुळे झाडांची छाटणी करणे आवश्यक होते, त्याप्रमाणे झाडांची फक्त छाटणी केली असून, एकही वृक्ष तोडला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्ञपवार यांचीही उपस्थिती होती. यावेळी पत्रकार राजाभाऊ वैद्य, अमजद सय्यद, विनोद बाकले, सज्ञन यादव आणि किरण कांबळे यांची उपस्थिती होती.

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
आपलं धाराशिव....
बुधवार दि.4 जून 2025

# देश-विदेशातील २४ कंपन्यांची कौडगाव एमआयडीसीमध्ये गुंतवणूक

## टेक्निकल टेक्स्टाईल पार्कला गती, १६.५४ कोटींच्या पायाभूत कामांचा आमदार राणा पाटील यांच्या उपस्थितीत शुभारंभ





आरंभ मराठी | धाराशिव

तालुक्यातील कौडगाव येथे राज्यातील पहिल्या टेक्निकल टेक्स्टाईल पार्कची उभारणी होत आहे. या पार्कमध्ये सुमारे २४ पेक्षा अधिक कंपन्यांची गुंतवणूक अपेक्षित असून, त्यापैकी १० कंपन्या विदेशातील आहेत. दरम्यान, एमआयडीसीमध्ये पायाभूत कामांचा शुभारंभ आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला असून, १६ कोटी ५४ लाख रूपये खर्चून अंतर्गत रस्ते व अन्य मूलभूत सुविधा विकसित केल्या जात आहेत. या उपक्रमामुळे एक निर्णायक पाऊल पुढे पडले असून, जिल्ह्याच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीचे नवे पर्व सुरू झाल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.कौडगाव एमआयडीसीत ३०८ एकर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या टेक्निकल टेक्स्टाईल पार्कसाठी एमआयडीसीमार्फत एकूण ११४ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये रस्ते, पूल, पाणीपुरवठा, पाइपलाइन, वृक्षारोपण व विद्युतीकरण आदी सुविधा समाविष्ट आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १२.०७ कोटींचा रस्तेविकास व उर्वरित रक्कम इतर खर्चासाठी मंजूर करण्यात आले आहेत.अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अंतिम आठवड्यात प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'टेक्निकल टेक्सटाईल मिशन'ची घोषणा केली. या निर्णयामुळे कौडगाव येथील टेक्निकल टेक्सटाईल पार्कच्या कामाला अधिक गती मिळणार असून, औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे. धाराशिव-बार्शी रस्त्याचे काम वेगात सुरू आहे. तसेच कौडगाव एमआयडीसी परिसरात ५० मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प कार्यान्वित झाला आहे, ज्यामुळे या भागात ऊर्जा सुरळीतपणे उपलब्ध होईल.रिलायन्सची गॅस पाईपलाईन या औद्योगिक परिसराजवळून जात असल्यामुळे या भागाला औद्योगिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे अनेक उद्योजक येथे गुंतवणुकीसाठी उत्सुक असून, या प्रकल्पांच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट लवकरच साध्य होईल, असा ठाम विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

### जगप्रसिद्ध कंपन्यांसोबत राऊंड टेबल कॉन्फरन्स

धाराशिव जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसी येथे प्रस्तावित ''टेक्निकल टेक्सटाईल पार्क'' मध्ये देशी व आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करण्याच्या उद्देशाने, एक विशेष राऊंड टेबल कॉन्फरन्स आयोजित करण्यात येत आहे. या परिषदेत तांत्रिक वस्त्रनिर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांना सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. तांत्रिक वस्त्रनिर्मितीत जगप्रसिद्ध असलेल्या असाही कासेई कॉर्पोरेशन (जपान),ड्यूपाँट डी नेमूर्स इंक. (अमेरिका),तेजिन लिमिटेड (जपान),एसआरएफ लिमिटेड (भारत),मिलिकेन अँड कंपनी (अमेरिका),फ्रॉइडेनबर्ग ग्रुप (जर्मनी),बेरी ग्लोबल ग्रुप (अमेरिका)किम्बर्ली-क्लार्क कॉर्पोरेशन (अमेरिका),आहलस्ट्रॉम-मुंक्षो (फिनलँड-स्वीडन),जॉन्स मॅनव्हिल (अमेरिका) या आघाडीच्या १० कंपन्यांशिवाय, २४ इतर नामांकित देशी व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनाही कौडगाव येथील तांत्रिक वस्त्र पार्कमध्ये गुंतवणुकीसाठी सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.यात सहभागी कंपन्यांना कौडगाव येथे उभारण्यात येणाऱ्या टेक्निकल टेक्सटाईल पार्क अंतर्गत उपलब्ध भौगोलिक व औद्योगिक सुविधा यांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

# वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी बदर विभागाने नियोजन करावे

आरंभ मराठी | मुंबई

गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई विमानतळ येथे वॉटर टॅक्सी सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी बंदरे विभागाने याबाबतचे नियोजन पूर्ण करावे. तसेच गरजेच्या ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.वॉटर टॅक्सी सुरू करण्याबाबत मंत्रालयात बैठक संपन्न झाली.त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. बैठकीस परिवहन,बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाचे ब्रिजेश सिंघल, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रदीप बढीये यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.मंत्री श्री. राणे म्हणाले, वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी टर्मिनल उभारणी टप्प्या टप्प्याने सुरू करावी. तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. माल वाहतुकीसाठीही जेटी उभारण्यासाठी ठिकाणे निश्चित करावीत. मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी राज्य सरकारने जलवाहतुकीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.नवीन वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. या सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भाग मुंबईशी चांगल्या प्रकारे जोडला जाईल. प्रवासाची वेळ सुमारे ४० मिनिटे असणार आहे. या वॉटर टॅक्सी सेवांमध्ये इलेक्ट्रिक बोट्सचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरणाला फायदा होईल. तसेच मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल आणि प्रवाशांना आरामदायक प्रवासाचा अनुभव मिळेल, असेही मंत्री श्री. राणे यांनी सांगितले.

# तुळजापूर बस स्थानकाच्या निकृष्ट कामाच्या विरोधात महाविकास आघाडीचे बोंबमारो आंदोलन

## अधिकारी आणि ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

आरंभ मराठी | तुळजापूर



तुळजापूर येथील जुन्या बस स्थानकाच्या झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने मंगळवारी (दि.३) बसस्थानकात आंदोलन करण्यात आले. भाविकांच्या सुविधेसाठी तुळजापूर येथे आठ कोटी रुपयांचा निधी खर्चून हे बस स्थानक उभे करण्यात आले आहे. मात्र या बस स्थानकात अनेक कामे ही निकृष्ट दर्जाची झाली आहेत. तसेच निविदेच्या रकमेपेक्षा दुप्पट खर्च दाखवून महामंडळाची व शासनाची फसवणूक करण्यात आली असून संबंधित अधिकारी ठेकेदार तसेच इतरांवर गुन्हे नोंद करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तसेच याबाबतची चौकशी करून अपहार झालेली रक्कम वसूल करण्याची मागणी देखील यावेळी करण्यात आली. या कामांमध्ये वाळू न वापरता डस्ट वापरून बांधकाम करण्यात आलेले आहे. याबाबत याअगोदरही निवेदन देऊन तक्रार करण्यात आली होती. मात्र त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. तसेच अनेक कामे ही निकृष्ट दर्जाची असून त्यामध्ये अनेक प्रमाणात त्रुटी असल्याचे देखील या निवेदनात म्हटले आहे. सध्या बस स्थानकाचा वापर सुरू असून देखील पाणी व लाईट ची सोय अद्यापही झालेली नाही. पाऊस आल्यास बस स्थानकामध्ये पुरेसा आडोसा देखील उपलब्ध नाही. त्यामुळे महिला, विद्यार्थी, जेष्ठ नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत असून त्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.याला कारणीभूत संबंधित अधिकारीच आहेत, अधिकारी व ठेकेदार यांनी संगणमत करून सदरील कामांमध्ये मोठ्या रकमेचा अपहार केल्याचे या निवेदनात म्हटले आहे. यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, अमोल कुतवळ ,ऋषिकेश मगर, श्याम पवार, उत्तम अमृतराव ,नागनाथ भांजी, रणजीत इंगळे, आनंद जगताप, अजय साळुंखे ,मधुकर शेळके, बालाजी तट ,श्रीकांत धुमाळ, दिगंबर माने ,युवराज पवार यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी ,नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बंदरे विभागाने लोकाभिमूख होण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा

मुंबइ - बंदरे मंत्री नितेश राणें दरे विभागाने मुख्यमंत्र्यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पहिल्या तीन विभागांमध्ये क्रमांक मिळवण्याच्या दृष्टीने काम करावे. तसेच अधिक लोकाभिमूख होण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.मंत्रालयात १५० दिवसांच्या अनुषंगाने बंदरे विभागाचा आढावा मंत्री श्री. राणे यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी परिवहन, बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी महामंडळाचे प्रशासकीय अधिकारी प्रदीप बढीये यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.मंत्री श्री. राणे म्हणाले, १५० दिवसांच्या कार्यक्रमासाठी बंदरे विभागाने परिपूर्ण तयारी करावी. वेगवेगळ्या राज्यात बंदरे हाताळणीसाठी वापरण्यात येत असलेल्या नवनवीन तंत्रज्ञानाचा विभागाने अभ्यास करावा. बोटींना ट्रॅक करण्यासाठी ॲप विकसित करावे.

# पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकाऱ्यासमोर हाणामारी

## लोकप्रतिनिधी व कर्मचारी यांच्यात कामाचे बील काढण्यावरून वाद

आरंभ मराठी | भूम

भूम पंचायत समिती येथे गट विकास अधिकारी कार्यालयात तांत्रिक अधिकारी व जयवंत नगर येथील ॲड. रवींद्र नागरगोजे यांच्यात शाब्दिक चकमक होऊन त्याचे हाणामारीत रूपांतर झाल्याने खळबळ माजली. भूम तालुक्यात यापूर्वी देखील लोकप्रतिनिधी आणि कर्मचारी यांच्या अनेक तक्रारी झाल्याचे प्रकार घडले असून पोलिसात देखील तक्रारी झालेल्या आहेत. जयवंनगर येथील ग्रामपंचायत ॲड. रवींद्र नागरगोजे यांच्या ताब्यात असून त्यांच्या पत्नी सरपंच म्हणून काम करत आहेत. ग्रामपंचायत व रवींद्र नागरगोजे यांनी मिळून ९५ लाख रुपयांची विकास कामे केली असून याची बिले गेल्या १८ महिन्यांपासून प्रलंबित आहेत. या कामावर तांत्रिक अधिकारी म्हणून रवींद्र राख यांनी काम पाहिले असून, मोजमाप पुस्तिका तयार करण्यासाठी अनेक दिवस नागरगोजे प्रयत्न करत होते. परंतु झालेल्या कामामध्ये ग्राम पंचायतची चूक असल्याने बिले काढण्यास विलंब होत असल्याचा आरोप राख यांनी केला आहे .रवींद्र नागरगोजे हे दिनांक २ जून रोजी गटविकास अधिकारी जी.टी.वग्गे यांच्या दालनात बसून बिलासंदर्भात चर्चा करत होते. त्यावेळी राख त्या ठिकाणी आले असता, नागरगोजे व राख यांच्यात शाब्दिक चकमक सुरू झाली आणि त्याचे हाणामारीतच रूपांतर झाले. गट विकास अधिकारी यांच्यासमोर झालेल्या राड्याने पंचायत समिती कार्यालयात गर्दी जमा झाली होती. यावेळी यावेळी उपस्थितांनी मध्यस्थी करून हाणामारी थांबवली. नागरगोजे यांच्या पत्नी सरपंच असलेल्या ग्रामपंचायतचे बिले न निघण्यास ग्रामपंचायत जबाबदार असल्याचे राख यांनी सांगितले. ९५ लाख रुपयांच्या झालेल्या विकास कामाचे बिल काढण्यास उशीर का झाला, या बाबत वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत का? यावर चर्चा रंग लागल्या आहेत. तालुक्यात सरपंच, कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यातील वादांवर चर्चा करत असतानाच नागरगोजे यांनी मात्र कर्मचारी राख यांनीच मला मारहाण सुरू केली असल्याचे सांगितले. पंचायत समितीमध्ये नेमकी कर्मचाऱ्यांची अरेरावी वाढली की, लोकप्रतिनिधी म्हणून वावर करणाऱ्याचे आचरण बिघडले यावर चर्चा होत आहेत. गटविकास अधिकारी यांनी मात्र आपल्यासमोर घडलेल्या घटनेची वरिष्ठाकडे माहिती देणार असल्याचे सांगितले.

# आजारावर नियंत्रणासाठी संयमी जीवनशैली आवश्यक

नाशिक, :- नागरिकांच्या बदलत्या जीवनशैलीमुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत आहे. अशा आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आधुनिक उपचार पद्धतीसोबत संयमी जीवनशैली आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.श्री साईबाबा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, हार्ट इन्स्टिट्यूट अॅण्ड रिसर्च सेंटर नाशिकच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार डॉ. शोभा बच्छाव, आमदार सीमा हिरे, आमदार राहुल ढिकले, आमदार हिरामण खोसकर, रुग्णालयाचे प्रमुख डॉ.अनिरुद्ध धर्माधिकारी, डॉ.पल्लवी धर्माधिकारी, अण्णासाहेब मोरे आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, रुग्णालयाला श्री साईबाबा यांचे नाव देण्यात आले आहे. साईबाबांचा श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र जीवनात अंगिकारता आल्यास कुठलाच आजार होऊ शकत नाही. गेल्या काही वर्षात चांगल्या चिकित्सा पद्धती विकसित झाल्याने भारतीयांचे जीवनमान वाढले आहे. साईबाबा हॉस्पिटलमधील आधुनिक उपचार पद्धतींमुळे रुग्णांना चांगली वैद्यकीय सेवा मिळेल.

# ईदच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी घेतला कायदा व सुव्यवस्थेचा आढावा

मुंबई, - : आगामी ईद सणानिमित्त मुंबईबरोबरच राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला. आगामी ईदच्या पार्श्वभूमीवर राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख राखण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक घेण्यात आली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार सर्वश्री अस्लम शेख, अबू आझमी, अमीन पटेल, रईस शेख, श्रीमती सना मलिक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इकबालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त देवेन भारती, संबंधित विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.महाराष्ट्रात सण-उत्सव काळात कायदा सुव्यवस्था नेहमीच उत्तम राखली जाते. त्याचप्रमाणे आगामी ईदसाठी देखील शासनाने योग्य नियोजन केले असून या काळात कायदा व सुव्यवस्था चोख राखत सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आदेश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिले.बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई पोलिसांनी ईदनिमित्त केलेल्या उपाययोजनांबाबत यावेळी माहिती देण्यात आली

# महाडीबीटी पोर्टलच्या तांत्रिक बिघाडाचा शेतकऱ्यांना फटका: सोयाबीन बियाणे वाटपात गोंधळ,मेसेज आलेल्यांना वाटप सुरु

## पाच वेळा पेमेंट करूनही हजारो शेतकरी वंचित

हर्षवर्धन मडके | आरंभ मराठी

मोहा -महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या मोफत सोयाबीन बियाणे वाटप योजनेत तांत्रिक अडचणींमुळे मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. अर्ज करण्यासाठी ३० मे ही अंतिम तारीख होती. मात्र, तांत्रिक अडचणी लक्षात घेता अर्ज करण्यासाठी मुदत २ जूनपर्यंत वाढवण्यात आली. पण या वाढीव कालावधीतही अनेक शेतकऱ्यांना अर्ज करता आले नाही. काहींनी अर्ज प्रक्रिया पूर्ण करून शुल्क भरले, तरीही अर्ज सबमिट झाला नाही आणि त्याचा कोणताही मेसेज प्राप्त झाला नाही. कृषी विभागाने निवड यादी जाहीर केली असून, त्यांना बियाण्याचे वाटप सुरू केले आहे. त्यामुळे महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे मोफत सोयाबीन बियाणे वाटप योजनेत गोंधळ सुरू असून, अर्ज केलेल्या शेतकऱ्यांमध्ये संभ्रम,नाराजी वाढत आहे.



महाडीबीटी पोर्टल नव्याने सुरू झाल्यानंतर पोर्टलच्या अनेक तांत्रिक अडचणी होत्या. त्यातच कृषी विभागाने शंभर टक्के अनुदानावर सोयाबीन बियाणे वाटपासाठी अर्ज मागवले शेतकऱ्यांनी नियोजित वेळेत अर्ज करून शुल्क भरले. मात्र, पोर्टलवर सतत तांत्रिक अडचणी येत असल्याने अर्ज सबमिटच होऊ शकले नाहीत. काहींना '', काहींना ' ', तर काहींना न मिळण्याच्या समस्यांचा सामना करावा लागला.

महाDBT

यामुळे अर्ज प्रक्रिया अर्धवट राहिली. शासनाने अर्ज करण्याची मुदत ३० मे ऐवजी २ जूनपर्यंत वाढवली होती. पण या कालावधीत पोर्टल पुन्हा पुन्हा बंद होत होते. परिणामी, ही मुदतवाढ देखील शेतकऱ्यांसाठी निरुपयोगी ठरली. या योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांचे अर्ज यशस्वीरित्या सबमिट झाले आणि त्यांना त्यांना ३ जूनपासून बियाण्याचे वाटप सुरू झाले आहे. मात्र, ज्या शेतकऱ्यांना अर्ज सबमिट झाल्याचा कोणताही मेसेज मिळालेला नाही, त्यांचं पुढे काय होणार, याबाबत स्पष्टता नाही.

### शेतकऱ्यांना हेक्टरी ३ बॅग मिळणार

शेतकऱ्यांना ७५ किलो प्रति हेक्टर याप्रमाणे बियाण्यासाठी निवड झाली आहे त्यांना कमी बियाणे दिले म्हणून तक्रारी प्राप्त होत होत्या. पॅकिंग च्या तांत्रिक बाबीमुळे ज्या महाबीजचे पॅकिंग हे २२ किलो व ३० किलो मध्ये आहे त्यामुळे व बीबीएफ साठीचा हेक्टरी बियाणे दर ५५ किलो/हेक्टर दर वापरून बियाणे देण्याचे सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु, शेतकऱ्यांनी तक्रारी केल्यानंतर ७५ किलो सिडरेट गृहीत धरून यापुढे २२ किलोच्या एकूण तीन बॅग असे ६६ किलो, तसेच ३० किलोच्या असतील तर २ बॅग असे ६० किलो याप्रमाणे प्रति हेक्टरी (६० किंवा ६६) शेतकऱ्यांना बियाणे वितरण करण्यात येणार आहे. तसेच ज्यांना यापूर्वी ५५ किलो प्रमाणे बियाणे दिलेले आहे त्यांनाही जास्तीचे बियाणे देण्यात येणार आहे.

### योजना चांगली पण अंमलबजावणीत गंभीर त्रुटी

एकीकडे शासन चांगल्या योजना जाहीर करत आहे, मात्र अनेक शेतकऱ्यांना या योजनांची माहितीच वेळेवर मिळत नाही. आणि ज्यांना या योजना माहिती होतात, त्यांनाही त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागतो. परिणामी, अनेक प्रामाणिकपणे अर्ज करणारे शेतकरी योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. यावर्षी इतकी चांगली योजना राबवूनही त्याचा शेतकऱ्यांना फायदा होत नाही.

### जिल्ह्यात पाच हजार क्विंटल बियाण्याचे वितरण होणार

धाराशिव जिल्ह्यात ५००० क्विंटल सोयाबीन बियाण्याचे वितरण होणार होणार आहे. महाडीबीटी च्या नवीन नियमाप्रमाणे प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य यानुसार लाभार्थींची निवड झाली आहे. निवड झालेल्या लाभार्थींनी जर दिलेल्या वेळेत बियाणे घेतले नाही तर दुसरी यादी जाहीर केली जाईल. ज्या शेतकऱ्यांचे एकापेक्षा अधिक वेळा पेमेंट झालेले आहे, त्यांचे पैसे पुन्हा खात्यावर जमा केले जातील.

**रवींद्र माने**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी धाराशिव.**

# जिल्ह्यात विविध ठिकाणी वीज सुरक्षेचा जागर

## महावितरणचा विद्युत सुरक्षा सप्ताह



आरंभ मराठी | धाराशिव

महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त 'शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन राज्यभरात १ ते ६ जून दरम्यान वीज सुरक्षा सप्ताह साजरा होत आहे. सप्ताहाच्या दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी (०२ व ३ जून) धाराशिव मंडलातील सर्वच उपविभागांमध्ये विविध ठिकाणी वीज सुरक्षेचा जागर करण्यात आला.'आम्ही सुरक्षेचे शिल्पकार, शुन्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार' हे ब्रिद घेऊन वीज सुरक्षेबाबत जनजागृती करत निघालेल्या कर्मचारी-अधिकाऱ्याच्या मॅरेथॉनने १ जुनला लातूर परिमंडलात विद्युत सुरक्षा सप्ताहाचा शुभारंभ झाला. तर सोमवारी उपविभागीय स्तरावर वीज ग्राहकांपर्यंत पोहचत विजेचा वापर करताना घ्यावयाच्या खबरदारीबाबत प्रबोधन करण्यात आले. तूळजापूर शहर, धाराशिव शहर तसेच तेर, माळूंब्रा, मंगरूळ, नळदुर्ग, उमरगा, कळंब, वाशी आदी ठिकाणी वीज सुरक्षेबाबत प्रबोधन केले तसेच लोहारा व उमरगा येथे बाह्यस्त्रोत कामगारांना सेफ्टीटुलचे वाटप करण्यात आले.गुरूवार दि.५ जुनला वसुंधरा दिनी तूळजापूर व धाराशिव विभागीय स्तरावर वीज सुरक्षा व बचत विषयी रॅली काढण्यात येणार असून वृषारोपन ही केले जाणार आहे. तर ६ जून रोजी सकाळी परिमंडलातील सर्व शाखा कार्यालयातील जनमित्र वीज सुरक्षेबाबत प्रतिज्ञा घेणार आहेत. याच दिवशी महावितरणचा २० वा वर्धापन दिन सर्व कार्यालयांमध्ये उत्साहात साजरा करण्यातयेणारआहे.